गुहागरनिवासिनी
श्री दुर्गादेवी

सर्वस्वरुपे सर्वेशे सर्वशक्ति समन्विते ।
भयेभ्यस्त्राहि नो देवी दुर्गेदेवी नमोऽस्तुते ॥

श्री दुर्गादेवीचे पंचायतन

॥ श्री गणपती ॥

॥ श्री लक्ष्मी नारायण ॥

॥ श्री अश्वत्थ सूर्यनारायण ॥

॥ श्री कृष्णेश्वर ॥

श्री दुर्गादेवीचे जुने मंदिर व परिसर



चांदीचे सिंहासनावर विराजमान श्री दुर्गादेवी

श्री दुर्गादेवी देवस्थान फंड

पंच कमिटी



श्री. गोविंद (किरण)व. खरे
अध्यक्ष

श्री. गोविंद कृष्णाजी दीक्षित
उपाध्यक्ष

श्री. गोविंद महादेव खरे
सेक्रेटरी

श्री.वासुदेव (बाळा) खरे
खजिनदार

श्री. शांताराम द. गोखले
सदस्य

डॉ. श्री. आनंद (बाबा) खरे
सदस्य

श्री. अतुल फडके
सदस्य

श्री. संतोष मावळंकर
सदस्य

श्री. गणेश भिडे
सदस्य

सोनेरी क्षण...... जीर्णोद्धाराचे

रथायात्रा कलशांची......

कलशारोहण.....

श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाचे पुजारी व व्यवस्थापिका

वे. मू. चंद्रशेखर जोशी
पुजारी

वे. मू. अनंत गर्दे
पुजारी

कु. सारीका खरे
व्यवस्थापिका

सौ. गौरी खरे
व्यवस्थापिका

सोनेरी क्षण...... जीर्णोद्धाराचे

स्मरणिका प्रकाशन



चांदीचे सिंहासन

मा. खासदार राम नाईक यांची भेट



गुहागरनिवासिनी
" श्री दुर्गादेवी "

संकलन :
श्री. मु. रा. तथा नाना पाटणकर

प्रकाशक :
श्री दुर्गादेवी देवस्थान फंड
वरचापाट, गुहागर, जि. रत्नागिरी ४१५७०३
दूरध्वनी : ०२३५९ – २४०६६५, ९२७१०६८७२३

प्रकाशन :
मिति चैत्र वद्य ९ शके १९३०;
बुधवार, दि. ३० एप्रिल २००८

मुद्रक :
श्रीपाद ऑफसेट,गुहागर

संगणकीय अक्षर जुळणी :
सौ.संपदा पाटणकर

दुसऱ्या आवृत्तीचे निमित्ताने...

नागपूर येथील दुर्गादेवीचे भक्त श्री. प्रभाकर दातार एकदा गुहागरला आले होते. मला म्हणाले देवीची विस्तृत माहिती हवी आहे. त्याचवेळी श्री. नाना पाटणकर यांनी अशी सर्व माहिती जमवून, लिहून काढून, आम्हा पंचांना व काही जाणकार ग्रामस्थांना वाचून दाखविली असल्याचे स्मरण झाले. श्री. नानांकडे जाऊन ती मागितली आणि ''इदं न मम्'' म्हणून नानांनी ती माझेकडे सोपविली. मी तशीच ती माहिती नागपूरला पाठवली आणि दातार कुटुंबियानी ''गुहागर निवासिनी दुर्गादेवी'' या पुस्तकाच्या २,००० प्रती दि२५.११.२००१ रोजी सेवा म्हणून कोणतेही मूल्य न घेता जगदंबे पुढे आणून ठेवल्या. अनेक भक्तांच्या पसंतीस उतरलेले, अनेकांनी कौतुक केलेले आणि कित्येक भक्तांना हव्या असलेल्या, मागणी केलेल्या या पुस्तिका दुर्गादेवी देवस्थानने अनेक भक्तांना 'प्रसाद भेट' म्हणून दिल्या. काहींची विक्री केली. दोन / तीन वर्षात त्या सर्व संपल्याही. दुसरी आवृत्ती छापावी असे पंचकमेटीत ठरले पण त्याच वेळी जीर्णोध्दाराचे वारे वाहू लागले. पुस्तकाचा विषय मागें पडला.

आई जगदंबेच्या मनी जसे भव्य -दिव्य मंदिर निर्माण करायचे होते. आपला वैभव संपन्न दरबार जसा सजवायचा होता तसें वारें पंचकमेटी आणि ग्रामस्थांमध्ये भरू लागले. मातेचा संचारच झाला म्हणा ना. त्या आदिशक्ती महामायेच्या माया जालात आम्ही, सारे काही विसरलो. खरे सांगायचे तर आम्ही आमचे राहिलो नाही. झालो फक्त 'तिचे भुत्ये' !

मंदिर जीर्णोध्दाराचे काम पूर्ण झाले. आता तिचे मनी पुस्तक व्हावे असे आले आहे. पहिल्या पुस्तकातील परिसर व मंदिराचे अनेक संदर्भ आता बदलले होते. जीर्णोध्दाराचे निमित्ताने जमलेल्या भक्तांकडून काही जुनी माहिती मिळाली होती. या सर्व गोष्टींचा अंतर्भाव करून पहिल्या पुस्तकाची दुसरी सुधारीत आवृत्ती तयार करण्याची सेवा श्री. नाना पाटणकर यांनी स्वीकारली आणि हे पुस्तक लिहून तयार झाले. त्याची सुबक मांडणी करून श्रीपाद ऑफसेट , गुहागरचे श्री. मयुरेश पाटणकर यांनी पुस्तक छपाईची सेवा केली. या पिता-पुत्रांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही म्हणून त्यांनी मन:पूर्वक केलेली सेवा आई जगदंबेच्या चरणी रूजू झाली आहे असे म्हणतो.

आई ! तुझ्या इच्छेने, कृपेने, प्रेरणेने झालेली सेवा तुझ्याच चरणी अर्पण करतांना समाधान, आनंद, तृप्ती इतकीच की– यासाठी तू आम्हाला निमित्तमात्र केलेस. आम्ही सर्व पंच तुझे कृपाभिलाषी आहोत.

जगदंबेचा उदयोऽस्तु !

गो. कृ. दीक्षित.
उपाध्यक्ष
श्री दुर्गादेवी देवस्थान फंड

तेथे कर माझे जुळती !

भक्त निवासाचे काम पूर्ण झाले आणि श्री दुर्गादेवीच्या मंदिराचे जीर्णोध्दाराचा विषय निघाला. नवीन जीर्णोध्दार कमिटी स्थापन झाली. बांधकामाचा आराखडा तयार होताच चाळीस लाखाचे अंदाजपत्रक तयार झाले. निधी जमला होता फक्त नऊ लाख, मात्र जिद्द होती अमर्याद. बोरिवली येथील आर्किटेक्ट व देवीचे भक्त श्री. हेमंत ढवळे दीड वर्षापूर्वी नवरात्रात इथे आले होते. सहज बोलतांना जीर्णोध्दाराचा विषय निघाला त्यांनी विनामोबदला या मंदिराचे डिझाईन मी देईन असे कबूल केले. आर्किटेक्ट म्हणून जे जे करावे लागते ते ते सर्व त्यांनी पूर्ण केले . साऱ्या सवंगड्यानी तन-मन झोकून दिले. आई जगदंबेचा आशीर्वाद पाठीशी होता.

कॉन्ट्रॅक्टर ठरले श्री. शिन्दे, त्यांनी कामाला सुरवात केली नऊ फुटाच्या प्रत्येक कॉलमच्या खड्डयात मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात देखील नितळ पाण्याचे झरे चहू बाजूंनी वहात राहिले, तेव्हाच समाक्षा आली की, जगदंबेचे हे मंदिर उभे रहाताना पाण्यासारखा पैसा निश्चित उभा रहाणार आणि याची जाणीव पुढे प्रत्येक प्रसंगाला, प्रत्येक घटनेला, प्रत्येक क्षणाला येत गेली.

श्री. दिलीप पेठे व सौ. राधा पेठे यांनी पांच लाख रूपये आईच्या मंदिरात बसून दिले. ऑगस्ट महिन्यापर्यंत सर्व आर.सी.सी. काम पूर्ण झाले. त्याच सुमारास आई जगदंबेने तिच्या मंदिरावरील कळस निर्माण करण्यासाठी श्री. जयंत शेणोलीकरांना आमच्याकडे पाठवून दिले. कळस उभा करायला अडीच लाख रूपये खर्च येईल असे फोनवर बोलणे झाले आणि तिसऱ्या दिवशी २,५१,००० रूपयांचा बँक ऑफ इंडियाचा धनाकर्ष शेणोलीकरांनी पाठवून दिला. श्री. भा. वा. पेठ्यांनी १ लाख रूपये पाठवून दिले. अनंत भक्तांनी आपापल्या परीने पाच, दहा, पंचवीस, पन्नास अशा हजारातील रकमा देणगी म्हणून दिल्या. मंदिराचे काम इलेक्ट्रीक फिटींग पर्यन्त आले. परमारबाईंनी त्यासाठी एक लाख दिले पाठवून. आता परिस्थिती अशी निर्माण झाली की, तोंडातून शब्द काढावा आणि समोरच्या भक्ताने म्हणायचे ''हां, दिले पैसे !''

आता लोकांच्या अपेक्षा वाढू लागल्या होत्या. प्रत्येक जण आपापल्या परीने मातेचे मंदिर सुशोभित करण्यासाठी कल्पना सुचवित होता. जमेची बाजू संपत

आली होती आणि ख़र्चाचा आकडा वाढत चालला होता. एक दिवस अचानक निरोप आला. श्री. भा. वा. पेठ्यांना पत्र पोचलयं. त्यांनी इतकाच निरोप दिलाय – ''पैसे कमी पडलेत ना ? पांच लाख रूपये मी माझ्या खात्यातून तुला ट्रान्सफर करतो. जे जे मनात योजले आहेस ते ते पूर्ण कर. देवीच्या वास्तूत कुठेही कमी पडू देऊ नकोस.'' पाठोपाठ उभे राहिले श्री. दिलीप पेठे आणि सर्व पेठे कुटुंबीय. त्यांनी सांगितले आई जगदंबेचे सिंहासन, पाठीमागची प्रभावळ आपण चांदीची करू. नाशिकहून त्यांची माणसं आली, मापं घेऊन गेली. सिंहासन, प्रभावळ चांदीची होणार हे नक्की झाले. श्री. दिलीपरावांचा फोन आला, ''आईचा मुकुटही सोन्याचाच बनवावा असे मनात आले आहे'' आणि जगत्जननीच्या मुकुटाचं मापही नाशिकला पोचले. समोर लाईट फिटींगचे काम सुरू होते. सहज मनात आले आई जगदंबेच्या दरबारात सनई चौघड्याचे सूर घुमावेत. कळत नकळत हाही निरोप योग्यस्थानी पोचला. पेठे साहेबांच्या भावाने श्री. चिन्मय पेठे यांनी म्युझिक सिस्टिमसाठी पैसे पाठविले.

आर्थिक मदतीबरोबरच संपूर्ण मंदिराचे काम करण्यासाठी अनेकांचे योगदान मिळाले. गाभाऱ्याचे बांधकाम गुहागरच्या श्री. प्रभाकर घाडे यांनी अहोरात्र मेहनत करून वेळीच पूर्ण करून दिले. ग्रॅनाईट, कोटा, मार्बल याच काम राजस्थानचे श्री. शाम सिंग यानी तर लाकडाचे कोरीव काम श्री. शहाबुद्दीन खान, राजस्थान यांनी केले. श्री. चंद्रकान्त उर्फ आबा बाईत यांनी सिमेन्ट खरेदीसाठी एक स्कीम करून दिली. त्यामुळे अतिशय स्वस्त दरात सिमेन्ट उपलब्ध झाले. गुहागरतील इलेक्ट्रीक कॉन्ट्रॅक्टर श्री. माधव (भाऊ) देवधर यांनी बांधकाम करताना आणि नंतरही इलेक्ट्रीक फिटींगचे सर्व काम वेळी अवेळी माणसें पाठवून करून दिले.

आई जगदंबेचे मंदिर उभे रहात असताना तिनेच अनेकांकडून सेवा घेतली सर्वांचा नामोल्लेख करणेसुध्दा अशक्य आहे. अशा सर्वांना सहकार्याबद्दल धन्यवाद देतो.

कृपा करतां नारायणें । लक्ष्मीसी काय उणे ।
ज्याची लक्ष्मी त्यासी आपणे । बळकट धरावा ॥ दासबोध ॥

मंदिराचे काम पूर्ण झाले आणि सुरू झाली धावपळ जीर्णोध्दार सोहळ्याची. आई जगदंबेच्या शिखरांवरील तांब्या – पितळेचे कलश ग्रामदेवता व्याघ्रांबरीच्या

देवळापासून मिरवणूकीने श्री दुर्गादेवी मंदिरात आणायचे ठरले. उंट घोड्यांसह कलशांची मिरवणूक शाही दिमाखाने श्री दुर्गादेवी मंदिरात पोचली. ह. भ. प. आत्माराम महाराज सोलकर यांनी कलशारोहण केले. नजरसुद्धा ठरत नव्हती इतक्या उंचीवर चढून, कलश शिखरावर ठेवायचे जोखमीचे काम, जीवावर उदार होऊन श्री. विश्वास खरे, श्री. विवेक (मास्तर) जोशी व श्री. मिलिंद गाडगीळ यांनी केले. निस्सीम श्रद्धा होती ती आई जगदंबेच्या कृपेवर. स्मरणिका प्रकाशन व कृतज्ञता सोहळ्यासाठी मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध कलाकार श्री. अतुल परचुरे आले. ''असं आहे माझं कोकण'' हा सांस्कृतिक कार्यक्रम स्थानिक महिलांनी सादर केला. कोकणातील जुनी संस्कृती फार कौशल्याने मांडली आणि उत्तम अभिनयाने, कुशल नेपथ्याने हा कार्यक्रम फार उंची गाठून राहिला. कोकणातील लोककला खेळे सादर करण्यात आले. सारेगम फेम कु. आनंदी जोशी व कु. अमृता गोखले यांचा ''स्वरबहार-एक सुरेल मैफल'' हा गाण्यांचा कार्यक्रम झाला.

श्री दुर्गादेवीच्या धार्मिक कार्यक्रमांत श्री. दिलीपराव पेठे यांचे हस्ते महागणपती पूजन व पंचायतन पूजन. श्री. भा. वा. पेठे यांचे हस्ते सायंपूजा. दुसऱ्या दिवशी श्री. रामभाऊ पेठे यांनी काकड आरती केली. तर शेणोलीकरांनी महापूजा केली. शतचंडी पाठवाचनाला श्री. उल्हास पेठे बसले. मध्यान्ह आरतीला श्री. ढवळे उभे राहिले.

आईचा जीर्णोध्दार सोहळा सुध्दा भव्य दिव्य स्वरूपात तिच्या सर्व भक्तांनी एक दिलाने संपन्न केला.

श्री. किरण खरे
अध्यक्ष
श्री दुर्गादेवी देवस्थान फंड

गुहागरवासिनी दुर्गादेवी

कोकणातील परशुराम भूमीत, रत्नागिरी जिल्हयात, मुंबई -गोवा या सतरा क्रमांकाच्या महामार्गावरून किंवा कोकण रेल्वेने चिपळूण येथे आल्यावर तेथून ४५ किलो मीटर अंतरावर पश्चिमेकडे गुहागर हे तालुक्याचे ठिकाण आहे. गुहागर गावात प्रवेश केल्यावर उत्तरेकडे दोन किलोमीटर अंतरावर वरचापाट येथे गुहागर -वेलदूर रस्त्यावर श्री दुर्गादेवीचे मंदिर आहे. दापोली येथे येऊन दाभोळ येथील फेरीबोटीने दाभोळची खाडी पार करुन धोपावे, रानवी मार्गे किंवा वेलदूर मार्गे गुहागरला येता येते. दापोली ते गुहागर हे अंतर ४० कि.मी. आहे. रत्नागिरीकडून यायचे झाल्यास, निवळी गावातून गणपतीपुळ्यासाठी जाणाऱ्या रस्त्याने जाकादेवी येथे येऊन भातगांव पुलावरून आबलोली-शृंगारतळीमार्गे गुहागर हा फक्त ९० किमी प्रवास होतो.

देवीचा खांब

गुहागर-वेलदूर रस्त्यावर वरचापाट येथे रस्त्यालगत देवीचा खांब आहे. तो आकर्षकरीत्या रंगविला असल्याने प्रथम दर्शनीच मन प्रसन्न होते. आई जगदंबेच्या मंदिराची ही पहिली ठळक खूण. या खांबाचे माहात्म्य फार आहे.

फार -फार वर्षापूर्वी या खांबाचे जागेवर आजच्या रस्त्याच्या पातळीखाली साधारण १०।१२ फूट खोल जागी देवीचे मंदिर होते. समुद्रमार्गे येणाऱ्या धर्मांध, आक्रमक चाच्यांच्या दहशती मुळे आज आहे तेथे, समुद्रापासून आणि नेहमी वर्दळ असणाऱ्या रस्त्यापासून आत, त्यावेळी असलेल्या जंगल भागात, डोंगर पायथ्याच्या वृक्षराजीत हे मंदिर नेण्यात आले असे जुनी माणसे सांगतात.

मंदिर आणि मूर्ती अशा प्रकारे सुरक्षित जागी नेल्यावर मूळ स्थानी खांब उभारून, त्याच्या चारही बाजूंवर देवतांच्या मूर्ती बसविल्या आणि हेच मंदिर असल्याचा आभास निर्माण केला, असा समज आहे. हा खांब आज जेवढा वर दिसतो तेवढाच जमिनीखाली आहे ही बाब या दंतकथेचा पुरावा म्हणून सांगितली जाते.

याच खांबासंदर्भात आणखी एक दंत कथा सांगितली जाते. देवीने आपल्या नथीतील तुटलेला मोती रूईच्या पानावर टोचून ठेवला ते झाड याच जागी होते. त्या रूईच्या झाडाचे जागेवर नंतर विजयोत्सवाचे स्मरण म्हणून खांबाचे बांधकाम केले गेले. आता या खांबाशेजारी प्रवेशद्वार म्हणून कमान उभी केली आहे.

पाखाडी आणि कमान

या खांबापासून देवीचा परिसर सुरू होतो. या खांबापासून मंदिराच्या कमानी पर्यन्त दुचाकी वाहन जाईल असा सुंदर रस्ता तयार झाला आहे. त्याला ''दुर्गेची पाखाडी'' म्हणतात.

पूर्वी खालच्या शेताडीच्या समपातळीत हा रस्ता होता. भक्तांना चिखलातून मंदिरात जावे लागत असे. एकापुढे एक असे जांभ्याचे चिरे टाकून चिखलविरहित रस्ता तयार झाला. नंतर शके १८६८ च्या सुमारास कै. त्र्यंबक विष्णू दीक्षित या धुळ्यात वकिली करणाऱ्या ग्रामस्थांनी आपले काका कै. वासुदेव बल्लाळ दीक्षित यांचे स्मरणार्थ या पाखाडीचे जांभ्या दगडात पक्के बांधकाम करून घेतले. आजही त्यांच्या नावाचा स्मृति स्तंभ रस्त्याच्या उजव्या बाजूला देवीचे खांबाजवळ आहे.

नंतर हीं पाखाडी सुध्दा थोडी उखडली तेव्हा रस्त्याच्या उंचीची मजबूत पाखाडी व त्याही नंतर ७।८ वर्षापूर्वी आज दिसणारी (सिमेन्ट कॉंक्रीट रस्ता) पाखाडी ग्रामस्थांच्या श्रमदानातून तयार झाली. पाखाडीचा विकास क्रम असा आहे. प्रत्येक टप्प्याचे बांधकामासाठी भक्तांनी केलेले सहकार्य यात श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाने भर घालून ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

या पाखाडीवरून चालत -चालत आपण आई जगदंबेच्या कमानी जवळ पोहोचतो. मंदिराच्या / गावाच्या प्रवेशद्वारावर कमानी बांधण्याची प्रथा पूर्वापार आहे. त्या प्रथेप्रमाणे, पद्धतीप्रमाणे ही कमान निर्माण केली असावी. खरे वंशजांपैकी लक्ष्मीबाई खरे यांनी पूर्वीची कमान बांधली होती. ही जुनी कमान कमकुवत झाल्याने, पूर्वीच्या कमानीच्या जागेवरच भक्तांनी दिलेल्या देणगीत श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाने भर घालून आजची सुंदर कमान ८।१० वर्षापूर्वी बांधून घेतली आहे.

समाध्या आणि देवळें

आपण कमानीजवळ पोहोचल्यावर आपल्याला लगेच दिसतात दोन समाध्या. यातील पहिली समाधी कै. शिवरामशास्त्री शारंगभट खरे यांची असून दुसरी समाधी दातारांचे पूर्वजांपैकी कोणाची तरी आहे असे सांगितले जाते. म्हणजे ती वरलापाटची व मंदिराची रचना करणारे कै. पद्माकरभट्ट दातार यांची असावी.

या समाध्यांचे पुढे श्री कृष्णेश्वराचे मंदिर असून ते कै. डॉ. अच्यूत खरे यांचे पणजोबा कै. कृष्णंभट काका खरे (यांनाच रूद्रंभट म्हणत असत) यांनी बांधले. कृष्णेश्वराचे

मंदिरासमोर देवीचे तळे आहे. या तळ्याचे चारही बाजूंना पूर्वी पायऱ्या होत्या. आता एका बाजूला गडगा घालून पायऱ्या बुजविल्या आहेत. मात्र त्या गडग्याखाली आजही पायऱ्या आहेत त्या उन्हाळ्यात पाणी कमी झाल्यावर दिसतात. कै. रामकृष्ण जनार्दन सोहनी यांनी ८२।८५ वर्षापूर्वी या तळ्यात आज दिसणारा खांब बसविला. संपूर्ण खांब उत्तम प्रतीच्या सागवानाचा असल्यामुळे अजून चांगला सुस्थितीत आहे. या खांबावर व्यायाम, कसरती करताना मल्लखांबासारखा त्याचा वापर केला जात असे.

तळ्याच्या शेजारी दक्षिणेकडे, मंदिराचे दरवाज्या समोर जुना पिंपळवृक्ष आहे. पिंपळाला पार बांधला आहे. हे अश्वत्थ सूर्यनारायणाचे स्थान मानले जाते. आता देवस्थान फंडाने याच पिंपळपारावर मंदिर बांधले असून अश्वत्थ सूर्यनारायणाची सुंदर पितळी मूर्ती स्थापन केली आहे. अश्वत्थ सूर्यनारायणाच्या मंदिरासमोर, देवीच्या उजवीकडे गणपतीचे मंदिर आहे. हे मंदिर शके १८६१ मध्ये, मूळ गुहागरचे दीक्षित घराण्यातील परंतु गुहागर येथून धुळे येथे गेलेल्या कै. त्र्यंबक विष्णू दीक्षित यांनी आपले वडील कै. विष्णू बल्लाळ दीक्षित यांचे सदिच्छेवरुन बांधले असल्याचे जुनीं माणसे सांगतात. त्यापूर्वी नुसत्या दगडी चौथऱ्यावर ही मूर्ती अनेक वर्षे स्थानापन्न होती.   देवीच्या डावीकडे लक्ष्मीनारायणाचे मंदिर आहे.

कमानीतून आत येऊन आपण मंदिरातील पंचायतनाचे दर्शन घेतले. आईचा परिसर पायी फिरलो. या फिरण्यात जाणवले ते संपूर्ण परिसराचे वैभव. श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाने हा परिसर सजवून टाकण्याचा चंग बांधला आहे. कमानीतून आत आल्यावर देवीचे दर्शन घेण्यापूर्वी भक्तांचे पाय आपोआप धुतले जाण्याची आधुनिक व आकर्षक व्यवस्था आपल्या सेवेसाठी सज्ज आहे. आकर्षक फुलझाडे लावून देवीच्या पुजेला ताज्या व उत्तम विविध फुलांची व्यवस्था केली आहे. योग्य जागा शोधून शोभेची झाडे व हिरवळ (लॉन) लावली आहे. येणाऱ्या भक्ताला येथे थांबणे प्रसन्न वाटेल, चित्तवृत्ती आनंदी राहून देवीचे ध्यान, चिंतन, जप अधिक चांगला होईल यासाठी पंचकमिटी, पूजारी व ग्रामस्थ झटत आहेत. संपूर्ण मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी केलेला प्रदक्षिणा मार्ग ही आपले मन मोहून टाकेल असा आहे. कोणत्याही भक्ताला मंदिर परिसर अधिक आकर्षक होण्यासाठी काही कल्पना सूचली तर कार्यालयात तशी नोंद करावी. सविस्तर पत्र द्यावे. आपल्या कल्पनेची दखल घेऊन, शक्या-शक्यतेचा सर्वानुमते सर्वांगीण विचार करुन कार्यवाहीत आणण्याची भूमिका राहील.

आईचं मंदिर

आपण आई जगदंबेचा परिसर फिरुन पंचायतनाचे दर्शन पूर्ण करण्यासाठी या पंचायतनाचे मुख्य अधिष्ठान असलेल्या, मुख्य दैवताच्या श्री दुर्गादेवीच्या दर्शनासाठी जाणार आहोत. मंदिरासमोर उभे राहिले की वरचा नगारखाना दिसतो. त्याच्या खालीच मंदिरात जाण्यासाठी आपण उभे रहातो. '' पादस्पर्शं क्षमस्व मे '' म्हणून या पायरीला नमस्कार करुन आपण मंदिराच्या ओवरीत प्रवेश करतों.

समोर दिसतो मंदिराचा सुंदर कोरीव काम केलेला लाकडी दरवाजा. तेथून कै. नानासाहेब पेठे सभागारात प्रवेश करताच आपण थक्क होऊन जातो. आर.सी.सी. बांधकाम करतांना जुन्या मंदिराचे नाजुक कोरीव काम केलेले लाकडी खांब अशा कल्पकतेने बसविलेले आहेत की, आईच्या मंदिराचे सौंदर्यच नव्हे तर वैभव वाढविले आहे. त्यावरुन नजर काढून आपण आईच्या दर्शनाला थोडे अधीर होऊनच पुढें जातो. संपूर्ण चांदीच्या सिंहासनावर उभी असलेली श्री दुर्गादेवीची मूर्ती पाहताच आपले देहभान हरपते. आईचे ऐश्वर्य संपन्न रूप डोळ्यात साठवितांना आपल्या देहाचे 'डोळे' होऊन जातात. या जागृत, प्रभावी आणि पुरातन तितक्याच आधुनिक मंदिरात सर्व स्वरुपिणी जगन्मातेसमोर आपण आपले रहातच नाही.

चिंता मात्र नाहीं मनी । कोण पुसे चिंतामणी ।
कामधेनूची दुभणीं । नि:कामासी न लागती ॥

या दासबोधातील ओवीची 'प्रचिती' येते. आईचे दर्शन घेऊन शांत मनाने आणि प्रसन्न अंत:करणाने आपण भारावून जातो. मुखावाटे सहज शब्द बाहेर पडतात 'आई जगदंबेचा उदयोऽस्तु !'

रूप पाहतां लोचनीं... !

दुर्गा सप्तशतीचे पाचव्या अध्यायातील पहिला श्लोक आहे.

ॐ घन्टाशूलहलानि शङ्खमुसले चक्रं धनु: सायकं ।
हस्ताब्जैर्दधतीं घनान्तविलासच्छीतांशुतुल्यप्रभाम् ॥

(अर्थ – हातात घंटा, शूल, हल म्हणजे नांगर, मुसळ, चक्र धनुष्यबाण आणि त्रिशूल असलेली शरद ऋतुच्या चांदण्याप्रमाणे शुभ्र मनोहर दिसणारी)

हे वर्णन गुहागरच्या दुर्गादेवीचे वर्णन असावे इतके साम्य दुर्गादेवीच्या मूर्तीत आहे. आईच्या अष्टभुजा स्वरुपाचा ठाव लागत नाही. आठही हातात विविध आयुधें

आहेत. महिषासूरमर्दिनीने त्रिशूळाने महिषासुराचे मुंडके चिरून टाकले. या चिरलेल्या मुंडक्यातून मायावी राक्षस मानवी रूप घेऊन बाहेर पडून आईचा घात करण्याच्या प्रयत्नात असतो. त्या महिषासुराची शेंडी पकडून त्यालाही चिरलेल्या गंडस्थळात त्रिशुळाने चेपून टाकणारी, महिषासुराचे पाठीवर पाय रोवून उभी असलेली ही रणचंडी. तिचे वाहन असलेल्या सिंहाने महिषासुराचे पाठीवर आपले पंजे आणि दात रोवले आहेत.

युद्धभूमीवर भक्कम उभी राहून, राक्षसांचे, अशुभाचे, अत्याचाराचे निर्दालन करणारी श्री दुर्गादेवी भक्तांसाठी मात्र सुखदा, धनदा, वरदा, मोक्षदा आहे. क्लेशहारिणी, तापवारिणी, पापतारिणी आहे. भक्तांसाठी तिच्या मुखमंडलावर युध्दाचे क्रौर्य नाही. विजयानंदाचे शुभंकर, मंगलकारी हास्य आहे. शरदऋतूतील चांदण्याप्रमाणे शुभ्र, शांत, मनोहारी अंगकांती भक्तांच्या भक्तीला, श्रद्धेला अध्यात्मिक जोड देते. चांदीच्या सिंहासनावर उभ्या असलेल्या आईच्या दोन्ही बाजूस रिध्दी–सिध्दी आहेत. जवळच आईचे आराध्यदैवत असलेले शिवलिंग आहे. ही शिवशक्ती भक्तांचे मंगल करण्यासाठी, सर्व मनोकामना पुरवून आत्मानंद देण्यासाठी, आपल्या स्वरूपात सर्वांना सामावून घेण्यासाठी येथे राहिली आहे.

थोडे जुने संदर्भ...

नगरात प्रवेशले पंडु नंदन । तो देखिले दुर्गास्थान ।
धर्मराज करी स्तवन । जगदंबेचे तेधवां ॥

श्री दुर्गादेवी स्तोत्रातील ही पहिली ओवी गुहागरवासिनी श्री दुर्गादेवीची आहे असे अनेक जाणकार सांगतात. हा संदर्भ घेऊन गणित मांडले तर हे मंदिर पांडव कालीन आहे. पाच हजार वर्षांपूर्वीचे आहे असे वाटते. त्याकाळात मंदिर म्हणजे फक्त देवळी होती. जीर्णोध्दारापूर्वीचा गाभारा होता. त्यावेळच्या आख्यायिका पुढें दिल्या आहेत.

इस्लामी सुलतानीत आज आहे तेथे मंदिर बांधण्यात दातार घराण्यातील पद्माकरभट्ट दातार या भक्ताचा उल्लेख केला जातो. त्यांनीच हा गांव वसविला. इतकेंच नव्हेतर आंजर्ला, मुरूड व गुहागर हे गांव त्यांनी वसविले. तिन्ही गावांत दुर्गादेवीची मंदिरे बांधली. या तीनही गावांतील मूर्ती एकसारख्याच आहेत. फक्त गुहागरची मूर्ती गंडकी शिळेची कनार्टक प्रांतातून आणलेली असून आंजर्ला व मुरूड येथील मूर्ती

काळ्या पाषाणातील आहेत. जीर्णोद्धारापूर्वीचे गुहागरचे मंदिर आणि मुरुड ,आंजर्ला येथील मंदिराचे बांधकाम सुद्धा सारखे आहे. मंदिराची रचना, खांबावर, कमानीवर, छतांवर केलेले लाकडातील कोरीव काम सारखेंच आहे. फळे, फुले, वेली, राक्षसांची तोंडे, भौमितिक वर्तुळातील व चौरसातील नक्षी असे अप्रतिम कोरीव काम हे या मंदिरांचे वैशिष्ट्य. गुहागरच्या मंदिरात देवी समोर उभे राहिल्यास सभामंडपाच्या डावीकडील पहिल्या खांबावर एका बाजुला कोरीव काम नाही. तसाच कोरीव काम नसलेला खांब मुरुडच्या मंदिरात आहे. या बाबतीतील पारमार्थिक अर्थ किंवा काही गूढ आहे किंवा कसें याचा शोध जिज्ञासूंनी घ्यावा. कदाचित कोरीव काम करणाऱ्या कलावंतांच्या घराण्यातील ती परंपरा-रुढी असेल. हे संदर्भ घेऊन गणित मांडले तर १०००/ १२०० वर्षापूर्वीचे हे मंदिर आहे असा निष्कर्ष निघतो. श्री दुर्गादेवीच्या मागची पितळी प्रभावळ शके ११६० मध्ये धोंडो सखाराम लुकतुके नावाच्या भक्ताने दिल्याचा संदर्भ मिळतो.

गुहागरचे शासकीय विश्रामगृह (तहसिलदार कार्यालया मागील इमारत) पूर्वी 'पेशव्याचे न्हाणीघर' होते. 'घारंभटाचा नारायण' या नावाने ओळखले जाणारे मंदिर (कीर्तनवाडीवर जाण्यासाठीच्या रस्त्यावर गुहागर नं.१ शाळेमागील देऊळ) आणि पेशव्याचे न्हाणीघर येथील कोरीव कामांत बरेच साम्य आहे. त्यामुळे पेशव्यांनीच मंदिराचा जीर्णोद्धार केला असावा असेंही मत पडते.

वरील सर्व विवेचनावरुन एकच गोष्ट लक्षात येते, मंदिर फार पुरातन आहे. श्री दुर्गादेवीची आराधना करणाऱ्या अनेक भक्तांचा उत्कर्ष झाला. अडचणींवर मात करता आली. आईने प्रसंगातून वाचविले. उत्तम पदें प्राप्त झाली आणि सर्व भक्तांनी त्या त्या काळाच्या परिस्थितीत तन-मन-धनाने देवीची सेवा करुन वैभव वाढविले.

आज देवीचे मंदिराचा जीर्णोद्धार करुन नवीन वास्तू निर्माण करतांना स्थल -काल परिस्थितीचा आढावा घेऊन, जुने वैभव आवश्यक तितके जपून, संभाळून नवीन मंदिर उभे केले आहे. फार फार वर्षापूर्वी कदाचित देवीमागची प्रभावळ लाकडी असेल, मग कोणी ती पितळेची करून दिली. आज एका भक्ताने संपूर्ण सिंहासन चांदीचे बनवून दिले. यापुढे अधिक प्रगत तंत्रज्ञान येईल त्याप्रमाणे मंदिर सजेल. आईचे वैभव वाढेल. या गोष्टी आपण सर्वच भक्तांनी समजून घेतल्या पाहिजेत. ती उदार भक्ती आपल्यात रुजवली पाहिजे, जागवली-वाढवली पाहिजे.

देवींचें रुपे

दुर्गदेवीच्या अंगावर (मूर्तीवर) बसेल अशी पूर्णाकृती चांदीच्या पत्र्याची मूर्ती तयार केली असून तिलाच 'देवीचे रुपे' असे म्हणतात. उत्सव काळात हे रुपे देवीला लावले जाते.

फार पूर्वीपासून देवीचे रुपे जांगळी घराणे आपल्याकडे सांभाळून ठेवीत आहेत. देवीचे उत्सवाचे वेळी ते आणून पोहोचवायचे आणि उत्सव झाल्यावर देवळातून पुन्हा आपल्या घरी घेऊन जाण्याची जबाबदारी ही मंडळी पिढ्यान् पिढ्या पार पाडीत आहेत. रुपें घरी नेंताना त्यांना नारळ आणि वस्त्र देण्याची पूर्वापार परंपरा आहे.

देवीच्या रुपाच्या बाबतीत एक दंतकथा सांगितली जाते. ज्या जांगळी यांचे घरी हे रूपे पितळेच्या डब्यात घालून ठेवले जाते त्यांचे घराला आग लागली. जुने केंबळारू घर पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले पण घरातील कोणालाही त्या आगीची झळ लागली नाही. घरातील सर्व माणसे सुखरूप घराबाहेर पडली. देवींचे रुपे मात्र घरातच राहिले. आग विझवल्यावर पहातात तो आई जगंदंबेची अपूर्व लीला लक्षात आली. ज्या बहालावर रुपे ठेवलेला पितळी डबा होता ते बहाल (भाल) आगीचा स्पर्श न होता जसेच्या तसे. पितळी डबा, त्यातील देवीचे रुपे या कशालाही अग्निनारायणाचा स्पर्श सुद्धा झालेला नाही.

देवीचा गालीचा

सुमारे १८५० साली दातारांपैकी एका भक्ताने साधारणपणे ३ फुट X ५ फुट आकाराचा लाल रंगाचा सुंदर गालीचा देवीच्या चरणी अर्पण करुन मातेच्या वैभवात भर घातली आहे. गालीच्यावर सोन्याच्या तारेने सुबक नक्षीकाम केले आहे. उत्सवात होणाऱ्या कथा कीर्तन किंवा अन्य महत्त्वाच्या कार्यक्रमाचे वेळी हा गालीचा अंथरुन ठेवला जातो. त्यावर चांदीची पान, सुपारी व नारळ ठेवला जातो. आई जगदंबेच्या उत्सवातील कार्यक्रमांना उपस्थित रहाणाऱ्या देवादिकांसाठी ही खास बैठक आईच्या दरबारात घालण्याची प्रथा पूर्वापार चालत आली असावी असे वाटते.

देवीची सेवा - धार्मिक कृत्ये

गुहागरवासिनी श्री दुर्गादेवी अनेक चित्तपावन कोकणस्थ, कऱ्हाडे, देशस्थ ब्राह्मणांची कुलस्वामिनी आहे. आपल्या कुलस्वामिनीच्या दर्शनाला अनेक कुटुंबे दरवर्षी येत असतात. स्थानिक परिभाषेत त्यांना ''कुळावे'' म्हणतात.

आपल्या कुलस्वामीनीची सेवा असे कुळावे म्हणजेच दर्शनाला येणारे भक्त अनेक प्रकारे करीत असतात. ''पत्रं, पुष्पं, फलं, तोयम् यो मे भक्त्या प्रयच्छति ।'' या गीतेतील वचनाप्रमाणे साडी-चोळी, सोन्या चांदीचे सौभाग्य अलंकार म्हणजे मणी मंगळसूत्र , बांगड्या, खटवी-जोडवी, कर्णभूषणे, शिरोभूषणे, पादभूषणे, कटीभूषणे, हस्तभूषणे शिवाय नथ, गळ्यात घालण्याचे विविध अलंकार अशा प्रकारच्या अनेक वस्तूंचा त्यात समावेश होतो. प्रत्येक वस्तूरुप देणगीची किंवा देवीला दिलेल्या रकमेची पावती श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाचे देवळातील कार्यालयाकडून प्रत्येक भक्ताला देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पावती झालेल्या अशा प्रत्येक वस्तूची फंड कार्यालयात नोंद असते. भक्तांनी देवीसाठी, मंदिरांसाठी, परिसर विकासासाठी, भक्तनिवासासाठी किंवा धार्मिक कृत्यांसाठी (अभिषेक वगैरे) दिलेल्या प्रत्येक रोख रकमेची किंवा वस्तूरूप देणगीची पावती मागून घ्यावी.

श्री दुर्गादेवीची पंचामृती पूजा/अभिषेक, बोडण, नंदादीप, अन्नदान, सप्तशतीपाठ, नवचंडी, नवचंडी हवन, कुंकुमार्चन, गोंधळ, ब्राह्मण भोजन, कुमारिका भोजन, सुवासिनी भोजन, ओटी तसेच नैवेद्यासह नित्यपूजा अशा विविध धार्मिक कृत्यांसाठी श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाकडे विशिष्ट दक्षिणा जमा करण्याची नवीन पद्धत भक्तांच्या सोयीसाठी अनेकांच्या सूचनेप्रमाणे पंचकमेटीने विचार विनिमय करून निश्चित केली आहे. मंदिरात येऊन वरील धार्मिक कृत्ये करु इच्छिणाऱ्या भक्तांनी ही दक्षिणा मंदिरातील कार्यालयात व्यवस्थापकाकडे जमा करुन त्याची पावती घ्यावी. फंड व्यवस्थापक श्रींचे पुजाऱ्यांना सांगून आपली धार्मिक कृत्ये आपल्याकडून करुन घेतील. ज्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून ही धार्मिक कृत्ये करणे शक्य नाही अशा भक्तांनी त्या धार्मिक कृत्यासाठी निश्चित केलेली दक्षिणा श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाचे नांवे चेक/डि.डि./मनिऑडर्रने पाठवावी. फंड व्यवस्थापक श्रींचे पुजाऱ्यांकडून आपली धार्मिक कृत्ये करून घेऊन पावती, प्रसाद, कुंकू आपल्याकडे पाठवतील. या नवीन व्यवस्थेत सर्व भक्तांनी सहकार्य करावे अशी देवस्थान फंडाची नम्र विनंती आहे.

देवीचा गोंधळ

या सर्व सेवांबरोबरच देवीचा गोंधळ हा सेवेचा मनोहारी सोहळा आहे. वर्षभरातील प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी देवीचा गोंधळ घालण्यात येतो. फक्त शारदीय नवरात्रात मात्र नऊही दिवस देवीचा गोंधळ घालण्याची प्रथा आहे.

ज्यांना आपला गोंधळ घालायचा आहे असे भक्त दिवट्यांसाठी तेल, प्रसादासाठी नारळ आणि दक्षिणा वाटण्यासाठी आपल्या हौसेप्रमाणे रोख रक्कम फंड कार्यालयात जमा करुन त्यांची पावती घेतात. ज्यांनी पावती केली आहे अशा सर्व भक्तांचा/कुळाव्यांचा गोंधळ एकाच वेळी घातला जातो. दरवर्षी आपल्या कुलस्वामिनीचा गोंधळ घालण्याची परंपरा अनेक घराण्यातून आहे आणि ती पिढ्यांनपिढ्या जपून, जागवीत, पुढील पिढीकडे सोपविली आहे. या शिवाय मुंज, लग्न, संततीप्राप्तीनंतर किंवा नवीन घर/गाडी घेतल्यावर इ. विशेष कारणांसाठी गोंधळ घालण्याची प्रथा अनेक घराण्यांनी कुटुंबानी, भक्तांनी सांभाळली आहे.

ज्यांना आपला गोंधळ घालायचा आहे असे भक्त तिन्हीसांजेच्यावेळी सहकुटुंब, सहपरिवार आपल्या नातेवाईक व मित्रमंडळींना बरोबर घेऊन आईचे देवळात येतात. देवीच्या सभागारात गोड्या तेलात भिजवलेले कापडाचे तुकडे घालून, मातीची परळे ठेवली जातात. कापडाच्या जाडसर वाती (काकडे) करुन पेटवतात. या दिवट्या हातात घेऊन सर्व भक्त परळांभोवती फेर धरतात. घंटा वाजवीत त्याच ठेक्यावर पुजारी गोंधळाचे पारंपारिक गाणे सांगून देवीला गोंधळाला बोलवितात.

अगड्या लो रे बगड्या लो । मुरूडची देवी गोंधळा याहो ॥
अगड्या लो रे बगड्या लो । कोल्हापूरची महालक्ष्मी गोंधळा याहो ॥
अगड्या लो रे बगड्या लो । बुधलची देवी गोंधळा याहो ॥
अगड्या लो रे बगड्या लो । अताडी लो रे पताडी लो ॥
संता लो रे सगड्या लो । अताडी लो रे पताडी लो ॥

गाणे म्हणताना दिवट्या पाजळून फेर धरलेला असतोच.

या पारंपारिक गाण्यात नीटसा अर्थबोध होत नाही असे प्रथमदर्शनी वाटले तरी या संसारसागराच्या अताडी असलेला, या तीरावरचा आमचा मुक्काम पताडी पैलतीरावर ने अशी देवीची, त्या आदीशक्तीची आळवणी आहे. अगड्या, बगड्या, सगड्या हे आपलेच प्रतिनिधी आहेत. ते आम्ही सर्व अज्ञानी, बद्ध, देहतादात्म्य

मानणारे जीव आहोत. संतानो आम्हांला सोबत घ्या आणि जगन्मातेच्या, श्री दुर्गादेवीच्या कृपेने आम्हांला पताडी न्या. आम्हांला पारमार्थिक ज्ञान होऊ दे. ''तत् त्वं असि'' या महावाक्याचा बोध आम्हांला होऊ दे. अध्यात्मिक क्षेत्रातील आमची रुची वाढू दे अशी आर्त विनवणी आहे.

आधी प्रपंच करावा नेटका । मग ध्यावे परमार्थविवेका ।
येथे आळस करु नका । तरी तुम्ही विवेकी ।
संसार मुळीच नासका । विवेके करावा नेटका ।
नेटका करीता फिका । होत जातो ।
परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी ।
या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ।।

या समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधातील शिकवणीचा विवेक आमचे ठाई जागृत होऊ दे. ही भावना देवीजवळ व्यक्त करण्याची पद्धत या अर्थहीन वाटणाऱ्या गाण्यात मोठ्या खुबीने मांडली आहे.

प्रपंच, संसार, मुलेबाळे या सर्व पसाऱ्याचा संभाळ करताना आमची होणारी दाणादाण, ताणाताण, ससेहोलपट, असंतुष्टता, असमाधान, अविवेक, यांचा घरात, देहात, मनात गोंधळ चालला आहे. तोच देवीपुढे मांडून, सांगून दिवट्यांच्या प्रकाशाप्रमाणे आमचे जीवन उजळून ''शिवं भूत्वा शिवं यजेत'' हे ज्ञान आम्हांला होऊ दे, आम्हांला अनुभवू दे. ''आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदची अंग आनंदाचे।।'' असे आत्मसुख प्राप्त व्हावे अशा प्रकाशाचे वलय, ज्ञानाचे वलय निर्माण व्हावे म्हणून फेर धरायचा. संसार नेटका व्हावा, सुखाचा व्हावा म्हणून देवीला आळवायचे असा भाव त्यात आहे.

हा फेर धरून झाल्यावर सर्वांनी आपापल्या दिवट्या परळात ठेवायच्या आणि ही पेटती परळे हातात घेऊन देवीची आरती करायची. आपल्यातील सर्व हीण जाळून टाकायचे. मग त्याच पेटत्या परळात आईच्या प्रसादाचे खोबरे टाकून भाजायचे. मोह, आशा, अहंकार, दंभ, राग, लोभ या षड्रिपूंचे बीज भाजून टाकायचे म्हणजे ते पुन्हा रुजणार नाही. हे भाजलेले खोबरे प्रसाद म्हणून घरी आणायचे. दान धर्माची सुरवात म्हणून दक्षिणा वाटायची. उपस्थित महिलांना हळदीकुंकू द्यायचे. मातेचे दर्शन घेऊन प्रसन्न मनाने घरी परतायचे असा हा देवीचा गोंधळ.

देवीचे उत्सव

चैत्र शुद्ध प्रतिपदेला देवीच्या मंदिरासमोर गुढी उभी करुन नववर्षाचे स्वागत केले जाते. गुढीची पंचोपचारी पूजा होते. गुढी पाडव्याच्या दिवशी देवीचे (चैत्र गौरी) हळदीकुंकू केले जाते. येणाऱ्या सर्व सुवासीनींची ओल्या हरभऱ्यांनी ओटी भरण्याची जुनी प्रथा आजही संभाळली जाते. या दिवसापासून वासंतिक नवरात्र उत्सव पूर्वी गावचे महाजन संपन्न करीत असत. त्या काळात महाप्रसादाला सार, सोजी, फणसाची भाजी असा बेत कायम असे. पुरणपोळीचे पक्वान्न करुन महाप्रसादाला सव्वीस रुपये चार आणे खर्च झाल्याची आठवण जुनी मंडळी आजही कौतुकाने सांगते. रामनवमीला देवीला रुपे लावतात.

देवीच्या खांबाजवळ दक्षिण बाजूला असलेल्या दक्षिणमुखी मारुतीचा जन्मोत्सव हनुमान जयंतीला संपन्न होतो. वटपौर्णिमेला देवीच्या पाखाडीत असलेल्या वटवृक्षाची पूजा सुवासिनी भक्ती भावाने करतात. आषाढ महिन्यात वद्य पक्षात एकादशीला (महा आषाढी) सकाळपासून लक्ष्मीनारायणाचे मंदिरात अनुष्ठानचा प्रारंभ होतो. पुरूषसूक्ताचे पठण व संतत धारेने जलाभिषेक असे या अनुष्ठानाचे स्वरुप असते. अनुष्ठानाचे दिवशी रात्री भजन जागर सर्व ग्रामस्थ जमून करतात. द्वादशीला दुपारी महानैवेद्य दाखवून अनुष्ठानाची सांगता होते. यावेळी अनुष्ठानात सहभागी असलेल्या सर्वांना महाप्रसाद असतो.

श्रावण महिना देवीच्या मंदिरात धामधूम असते प्रत्येक मंगळवार आणि शुक्रवारी मंगळागौरीसाठी गावात आलेल्या माहेरवाशिणी, सासुरवाशिणी, कुमारिका सर्वच दर्शनासाठी देवळात येत असतात. पुढचा भाद्रपद मात्र तसा थंडच असतो. एकतर सर्वांच्या घरी गणपती बाप्पा आलेले असतात.आणि नंतर पितृपंधरवडा त्यामुळे आईचे मंदिर जरा शांत. पण त्याच वेळी बाहेर चाललेली असते शारदीय नवरात्रोत्सवाची तयारी. कोणत्या स्पर्धा घ्यायच्या, गायन सेवेला कोण, कीर्तनाला बुवा ठरवायचे आहेत. गोंधळाला परळे हवीत. या सर्व गोष्टींची जुळवा जुळव सुरु होते.

शारदीय नवरात्र उत्सव पूर्वी नव्हता. वे. शा. सं.कृष्णंभटकाका खरे यांनी तो साधारण १५० ते १७५ वर्षापूर्वी सरू केला. सुरुवातीच्या काळात फक्त तेच हा उत्सव साजरा करीत. नंतर ४-५ खरे घराणी, त्यानंतर देवीचे खांडवातील सर्वजण

आणि साधारण २५ वर्षापूर्वीपासून संपूर्ण गावातील ग्रामस्थ हा उत्सव मोठ्या हौसेने सहभागी होऊन संपन्न करतात.

आश्विन शुध्द प्रतिपदेला घटस्थापनेच्या दिवशी उत्सवाला प्रारंभ होतो. नवरात्रात गावातील सर्व घरांतून देवीचा नैवेद्य देवळात आणून देण्याची पूर्वापार प्रथा आहे. त्याचप्रमाणे काहीजण दररोज सोवळे नेसून पूजेची सर्व तयारी घेऊन देवळात येतात आणि देवीची नित्य पूजा करतात. उत्सवात रोज सकाळी पंचामृती पूजा, अभिषेक, आरती, सप्तशतीपाठ, महानैवैद्य, दुपारी भजन, सायंकाळी गोंधळ, रात्री आरती, मंत्रपुष्प, कीर्तन, गायन असा भरगच्च कार्यक्रम नऊ दिवस चालू असतो. गावातील हौशी कलावंतांबरोबर बाहेर गावचे भक्त सुद्धा श्रद्धेने आपली कला, सेवा भावनेने सादर करून नवरात्र उत्सवाची शान वाढवतात. एक दिवस हळदीकुंकू होते.

आरत्या झाल्यानंतरचे ''देवे'' ही या देवळातील शान आहे. एका बाजुला आपस्तंभी तर दुसऱ्या बाजुला ऋग्वेदी ब्राह्मण उभे राहून तासभर देव्यांच्या स्वराप्रमाणे आवाजात चढ उतार करत, हातवारे करत देवे म्हणण्यात एक वेगळाच जोश असतो. हा जोश देवे म्हणाऱ्यांबरोबर देवे ऐकणाऱ्यांच्यातही चढतो.

नवरात्र उत्सवात देवीला जसे रुपे लावतात. तसेच सोनं, चांदी, माणिक मोत्याच्या विविध आभूषणांनी देवी लेवविलेली असते. त्यामुळे रात्री कार्यक्रम आटोपल्यावर देवळात कोणीतरी रहाण्याची व्यवस्था केलेली असते. या व्यवस्थेला स्थानिक परिभाषेत ''नवरात्राचा पहारा'' म्हणतात. पूर्वीपासूनच पहारा करण्यासाठी गावातील काही जणांनी आळीपाळीने नवरात्रात देवीच्या देवळात रहायला येण्याची पद्धत. देवीचे पंच मंडळ नवरात्रापूर्वी देवीच्या देवळात पहाऱ्याची यादी चिकटवतात. या यादीतला प्रत्येकजण कोणतेही कारण न सांगता रात्रीचे कार्यक्रम झाले की अंथरुण पांघरूण घेऊन देवळात येतो. हा पहारा करण्यामागे आणखी एक उद्देश आहे तो म्हणजे - देवीचं नवरात्र सुरू झालं की देवीच्या पुजाऱ्याने देवीचा परिसर सोडून कुठेही जायचं नसतं. त्याला सोयर सुतकही येत नाही. सहाजिकच देवळात पुजारी एकटा राहू नये यासाठी त्याला सोबत कुणीतरी त्याचं हक्काचं माणूस हवं म्हणून पहाऱ्याला गावातील काही जणांनी थांबायचं. नाहीतर जी जगत्‌जननी दुर्गादेवी गावाचं रक्षण करते तिच्या पहाऱ्यासाठी आमची काय गरजं ?

या उत्सवात साड्यांचा लिलाव होतो. वर्षभरात देवीला अर्पण केलेल्या साड्या लिलावात असतात. अनेक भक्त देवीचा प्रसाद म्हणून ह्या साड्या खरेदी करतात. विक्रीतून जमलेल्या प्रत्येक रकमेची देवस्थानकडून रीतसर पावती केली जाते. ह्या निधीचा उपयोग देवस्थानच्या विकासासाठी केला जातो.

नवमीला हवन करण्यात येते. त्याच दिवशी हवनाचे पूर्णाहूतीनंतर केळीच्या पानावर भाताची मोठ्ठी मुद घालून त्यावर उडीद व गुलाल टाकतात. मुदीच्या मधोमध पेटवलेला काकडा खोवतात. त्याला ''बळी'' म्हणतात. या बळीची पूजा करुन तो होमकुंड आणि देवीवर ओवाळून ही बळ गावाबाहेर पोचवितात. आपल्या घरासमोरून बळ गेल्यावर घरातील गृहीणी कवाडीबाहेर निखारे ठेऊन त्यावर पाणी ओतते. गावातील रोगराईला, सर्व प्रकारच्या अशुभाला घालवून देण्याची ती प्रथा आहे. यामुळे गावात आयुरारोग्य, ऐश्वर्य नांदते अशी श्रद्धा आहे. बळ काढून झाल्यावर देवळात महाप्रसाद होतो. दसऱ्याचे दिवशी सायंकाळी सर्व ग्रामस्थ देवळात जमतात. शमीपूजन करून सोने लुटतात. सायंकाळी पंचोपचारी पूजा होऊन धुपारत होते. त्यानंतर देवीचे रूपे काढून रूपे व देवीची मूर्ती यामधील पडदा(कापड) बाजूला करून देवीसमोर दहिभाताचा नैवद्य दाखविला जातो. या नैवेद्यावर मधोमध चीर पडण्याचा, मुदीचे दोन भाग होण्याचा चमत्कार अनेक वेळा पहायला मिळतो. नैवेद्य देवीसमोर ठेवल्यावर एक - दोन क्षणात हे सर्व घडते. नंतर देवीला नेहमीची वस्त्रे नेसवून सर्वजण देवीचे दर्शन घेतात व शारदीय नवरात्र उत्सवाची सांगता होते.

शारदीय नवरात्रानंतर नवान्न पौर्णिमा, दिवाळी, त्रिपुरी पौर्णिमा, संक्रांतीचे हळदीकुंकू, रथसप्तमी, माघी गणेशोत्सव, शिवरात्र हे देवळात साधेपणाने संपन्न होतात.

श्री दुर्गादेवीचे हे स्थान स्वयंभू आहे अशी अनेकांची श्रद्धा असल्याने देवीसमोर नारळ वाढविण्याची प्रथा नाही. स्वयंभू देवस्थानात नारळ वाढविण्याची (फोडण्याची) परंपरा नसते हे त्यामागील कारण. होळी पौर्णिमेला होमावर जाण्यापूर्वी केळीच्या पानावर काजळाने दातार, विंझे, गोळे मुकादम इत्यादी मानकऱ्यांचे नांवे होळीचे व धुळवडीचे निमंत्रण लिहून देवीसमोर ठेवतात नंतर हे निमंत्रणाचे पान श्री. अरुण परचुरे (सर), खालचापाट यांचे घराजवळील चौथऱ्यावर ठेवतात. फक्त त्याचवेळी देवीसमोर नारळ वाढवितात.

होळी पौर्णिमेला गावाचे धर्माधिकारी श्री. खरेशास्त्री यांच्या घरासमोरील शेतात देवीचा होम लागतो. देवीचे पुजारी होमाची पूजा सांगतात व देवस्थानचे सरपंच (अध्यक्ष) होमाची पूजा करतात. होमासाठी विस्तव (अग्नी) परटाचे घरातून येतो व होम लागतो. यावेळी दातार, विंझे, गोळे, मुकादम, पटवर्धन, गावचे महाजन आणि खांडवकरांचे मानाचे नारळ होमात टाकतात. गेली अनेक वर्ष हे मानाचे नारळ डॉ. खरे यांच्या घरातून देण्याची प्रथा आहे.

होळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी देवीचा पुजारी व काही गांवकर मंडळी वरचापाट भंडारवाडा येथील श्री देव नरनारायणाचे देवळा पर्यंत गुलाल उधळीत जातात. श्री नरनारायणाला गुलाल वाहून होमाच्या जागेवर येतात. तेथे रंगीत पाण्याचा अभिषेक करुन होमात न जळलेला शेवरा (याला शित असे म्हणतात) आणि होमाची विभूती गावकरी फाका घालीत सतीचे पाटावर आणून ठेवतात. गावातील सर्व गलिच्छपणा, वाईट प्रवृत्ती गावाबाहेर घालण्याची ही सांकेतिक प्रथा आहे. त्यानंतर ग्रामोपाध्याय व पुजारी श्री व्याडेश्वराचे देवळात जाऊन व्याडेश्वराला रंगीत पाण्याचा अभिषेक करतात. गूळ खोबरे, शेंगदाणे यांचा नैवेद्य दाखवून आरती करुन शिमग्यातील अपराधांची मानकरी, पंच, ग्रामस्थांसाठी क्षमा मागितली जाते.

सायंकाळी श्री दुर्गादेवीवर रंगीत पाण्याचा अभिषेक करुन गूळ खोबरे, शेंगदाणे यांचा नैवेद्य दाखवून आरती करतात. सर्व मानकरी, पंच व ग्रामस्थांचे सुदीर्घ आयुरारोग्यासाठी देवीची प्रार्थना करतात.

धुळवडीच्या दिवशी देवीच्या खांबाजवळ सर्व गावकरी जमतात. होळीच्या दहा दिवसांत होळकरांनी केलल्या खेळातून निर्माण झालेले सर्व गैरसमज परस्पर सामंजास्याने मिटवून मग खांबाजवळ नारळ फोडतात. आता हा कार्यक्रम देवीच्या परिसरातील पिंपळाखाली होतो. त्यानंतर देवीला रंगाने स्नान घालून, रंग उधळून धुळवडीचा उत्सव संपन्न होतो. नंतर देवीची मूर्ती स्वच्छ करुन पंचोपचारी पूजा, आरती, प्रसाद होतो.

अशा प्रकारे देवीच्या मंदिरात सर्व सण संपन्न होतात. दररोज सकाळ-सायंकाळ पूजा, आरती, दुपारी नैवेद्य केला जातो.

देवीचे पुजारी

१२०० वर्षापूर्वी पद्माकरभट्ट दातार यांनी मंदिराची रचना केली. त्यावेळपासून दातार देवीचे पुजारी होते. त्यानंतर वेदमूर्ती गुंडूकाका, वेदमूर्ती त्र्यंबक यज्ञेश्वर गाडगीळ, वेदमूर्ती नारायण गणेश खरे (पुराणिक), वेदमूर्ती वासुदेव महादेव खरे (वासूनाना) हे प्रत्येक पुजारी २५/३०/३५ वर्षे देवीची पूजा करीत होते. श्री. वासुनानांनी वृद्धापकाळाने आता माझ्याने यथासांग सेवा, पूजा होत नाही असे सांगितल्यावर श्री अनंत विष्णू जोशी यांनी ५ वर्षे पूजा केली. त्यानंतर आता जवळ जवळ २० वर्षे वेदमूर्ती चंद्रशेखर शंकर जोशी (काका) पूजा करीत आहेत. देवस्थानाचा जसा जसा विकास होत गेला, येणाऱ्या भक्तांसाठी अधिक सोयी सुविधा निर्माण झाल्या तसे तसे बाहेरगावाहून देवीच्या दर्शनासाठी, कुलस्वामिनीची सेवा करण्यासाठी येणाऱ्या कुळाव्यांची, भक्तांची संख्या वाढत जात आहे. त्यामुळे सन २००७ पासून वेदमूर्ती अनंत वासुदेव गद्रे यांची नेमणूक श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाने केली आहे. आज हे दोघे पुजारी आई जगदंबेची सेवा, सर्व सण, उत्सव या सर्व गोष्टी जबाबदारीने, एक दिलाने व अत्यंत श्रद्धेने यथासांग पार पाडीत आहेत.

देवीचे सर्व पुजारी वेदशास्त्र संपन्न होते व आहेत. पूजाऱ्यांची गेल्या १५०/२०० वर्षांची ही परंपरा त्यांच्या नावांसह वयोवृद्ध श्री. वासुनाना खरे आजही अभिमानाने सांगतात.

आई जगदंबेच्या दर्शनाला आलेला कोणीही भक्त नाराज होऊन पंचांकडे किंवा ग्रामस्थांकडे तक्रार घेऊन गेलेला नाही. येणाऱ्या प्रत्येक भक्ताचे पूर्ण समाधान आजवर प्रत्येक पुजाऱ्याने केले आहे. अत्यंत प्रसन्न चित्ताने आणि आनंदाने प्रत्येक भक्त येथून गेला आहे याचा अभिमान सर्व पूजारी, पंच आणि ग्रामस्थ आजही मिरवतात.

जुन्या आख्यायिका

देवीचा मोती

फार वर्षापूर्वीची गोष्ट. भारतात त्याकाळी सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात. आशय असा की, भारत हा वैभव संपन्न देश होता. रयत धार्मिक प्रवृत्तीची, देव-देवतांना भजणारी-पूजणारी, दान धर्म करणारी. सहाजिकच देवस्थाने सुद्धा ऐश्वर्य मिरवणारी. देवाचे वैभवात, ऐश्वर्यात प्रत्येकजण आपल्या प्रतिष्ठेप्रमाणे भर टाकणारा. त्यामुळे अनेक आक्रमकांना ह्या वैभवाने आकर्षित केले.

थोर वस्तूंचे संग्रहण । ते चि अनर्थासी कारण ।
ज्या कारणे जे भूषण । तें चि विदूषण रुप होय।
अतिरुप अतिधन । अतिविद्या अति प्रीती पूर्ण ।
अतिभोग अतिभूषण । विघ्नासी कारण तेचि होय ।

शिवलीलामृतातील चौथ्या अध्यायाचे या ओव्यांप्रमाणेच येथील वैभवाने विघ्न आणले. समुद्रमार्गे अनेक लुटारू, आक्रमक या भागात येऊन थैमान घालून येथील संपत्ती लुटून नेऊ लागले. या लुटारूंना केवळ सोन्या-नाण्याची लूट नेऊन पुरत नव्हती. सोन्याचांदीच्याबरोबर येथील गोधन-स्त्रीधन सुध्दा धर्मांध आक्रमक लुटारू पळवून नेऊ लागले. जाळपोळ करुन दहशत निर्माण करावी मग हल्ला करुन श्रीमंतांची घरे शोधून त्यातील संपत्ती लुटावी. जातान गोरगरीब शेतकऱ्यांचे शेतातील पीक कापून न्यावे. गोठ्यातील गोधन पळवावे. घरातील तरुण स्त्रियांना घेऊन जावे. आया बहिणींची, लेकी-सूनांची अब्रू वेशीवर टांगावी.

गावातील एक पतिव्रता नेहमींच घडणाऱ्या या घटनांनी दुःखी झाली. मनी संतापली, काया कष्टावली. विचार करु लागली कोणी थांबवायचा हा अत्याचार ? कोण करील पारिपत्य या यावनी आक्रमकांचे ? कोण वाचवील पतिव्रतांची अब्रू.... ? ... आणि तिला आठवली दुर्गास्तोत्रातील नित्य पाठांतरातील एक ओवी-

ऐकोनी धर्मराजाचे स्तवन । दुर्गामाता जाहली प्रसन्न ।
म्हणे तुमचे शत्रु संहारीन । राज्यी स्थापिन धर्माते ।।

आपल्या गावात दुर्गादेवीचे जागृत ठाणें असतांना आपण काळजी का करावी

? ती पतिव्रता धावत सुटली आणि देवळात जाऊन थांबली. मनोभावे देवीची पूजा केली. तिच्यापुढे गाऱ्हाणे घातले.

'' माते, शुंभनिशुंभांचा तू अंत केलास, स्वत:ला महिषासुर मर्दिनी म्हणवतेस. भक्तांची तारणकर्ती अशी तुझी कीर्ती. संकटनाशिनी हे तुझे ब्रीद. अनाथांचे रक्षण करणारी असा तुझा महिमा. तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणा समोर हात पसरायचे आम्ही. माते, हे लुटारू येतात आणि गावातील पतिव्रतांची, लेकी-सूनांची, आया-बहिणींची अब्रू लुटतात. गोठ्यातील गोधन पळवितात. गोरगरीब शेतकऱ्यांचे कष्टाने फुलविले शेत कापून नेतात. संपत्ती, सोने नाणे नेतात. आमचे सौभाग्य, पतिव्रतांची प्रतिष्ठा, मुलींची अब्रू तूच सांभाळली पाहिजेस. या सुलतानी संकटावर तूच मात करू शकतेस. या आक्रमकांचा तूच कायमचा बंदोबस्त कर. ''

त्याच पहाटे आई जगदंबा, गुहागरची दुर्गादेवी पुजाऱ्याच्या स्वप्नात आली. आज आलेली आक्रमकांची धाड युद्ध करुन मी परतवून लावली आहे. त्यांना पळवून लावले आहे. यानंतर हे कामांध, धर्मांध, आक्रमक यवन या गावात येऊन माझ्या गावकऱ्यांना त्रास देणार नाहीत. इतके सांगून माता पुढे म्हणाली, ''लुटारुंशी लढताना माझ्या नथीतील तुटलेला मोती पुळणीवर (समुद्र किनाऱ्यावरील वाळूत) रुईच्या पानाला टोचून ठेवला आहे तो परत आणा.''

उजाडताच पुजाऱ्याने स्वप्नातील हकीगत गावकऱ्यांना सांगितली. सर्व गावकरी जमून पुळणीवर गेले. देवीने दिलेल्या दृष्टांताप्रमाणे रुईच्या पानाला टोचून ठेवलेला मोती गावकऱ्यांनी शोधला. शुंभनिशुंभहननी, महिषासूरमर्दिनी, मधुकैटभ हन्त्री, चंण्डमुंण्ड विनाशिनी दुर्गादेवीचा जयजयकार करीत वाजत गाजत तो मोती गावकऱ्यांनी देवळात आणून देवीला वाहिला. आजही तो मोती देवीच्या दागिन्यात ठेवला असून उत्सवात तो देवीला वाहण्यात येतो.

हा मोती मोठ्या/विशेष कार्यक्रमांचे वेळी दर्शन घेण्यासाठी उपलब्ध असावा अशी अनेक भक्तांची मागणी होती. आता त्यासाठी व्यवस्था निर्माण करुन त्या मोत्याचे दर्शन घेता येईल अशा तऱ्हेनं तो ठेवला जाणार आहे.

क्लेशापासूनी सोडवी..

आपल्या देवदेवतांबद्दल, साधु संताबद्दल अनेक दंतकथा सांगितल्या जातात. भक्त रक्षणासाठी केलेले चमत्कार, घेतलेली विविध रुपे, दिलेला प्रसाद, मिळालेली शस्त्रे-हत्यारे इत्यादींच्या कथा पिढ्यान्‌पिढ्या भक्तिभावाने सांगितल्या जातात. निस्सीम भक्तांची त्यावर श्रद्धा असते. या गोष्टींची कोणी खिल्ली उडवू लागला तर त्यांना राग येतो. भावना दुखावल्या जातात. त्यावेळी वादविवाद होऊन कटुता निर्माण होते. दुर्गादेवीबद्दल अशीच एक दंतकथा सांगितली जाते. ती खरी आहे की खोटी आहे यावर वाद न घालता देव न मानणाऱ्यांनी विसरून जावे. देव मानणाऱ्यांनी संपूर्ण डोळस श्रद्धेने आपल्या पीडा हरण करण्यासाठी मातेची, आई जगदंबेची, श्री दुर्गादेवीची आर्ततेने, अनन्यभावाने विनवणी करावी आणि स्वत:च प्रचिती पहावी. '' भाव तसा देव'' या उक्तीप्रमाणे आईची आपल्यावरही कृपा होईल.

एकदा काय झाले सर्वांगावर इसब उठलेला एक वृद्ध गृहस्थ मातेच्या मंदिरात आला. तळ्यात आंघोळ करुन देवीसमोर बसला. आईची विनवणी करु लागला. '' माऊली मला या व्याधीपासून मुक्त कर, मला सोडव.'' या वृद्ध गृहस्थाला व्याधी तरी कशी तर सर्वांगावर चट्टे उठलेले, अंगाला भयंकर खाज सुटायची, आग व्हायची, रक्त-पू वाहून दुर्गंधी यायची. सतत तीन दिवस हा भक्त देवीसमोर बसून राहिला. अन्न पाण्याला शिवला नाही. मुखाने सतत मातेचे नामस्मरण, स्तोत्र पठण. आर्त आळवणी चालू. आता शब्द उच्चारायचीही शक्ती राहिली नाही. डोळ्यांतून आसवं खाली उतरु लागली. अंत:करणात मातेचे गोजिरे रुप ठसू लागले. मनी मानसी जगदंबेची कृपा दिसू लागली.

एक वृद्ध स्त्री देवीच्या दरबारात आली. हातात तेलाची कुपी. ''बाळा, हे तेल अंगाला लाव. मातेची आराधना अशीच सुरू ठेव. बघ उतारा पडतो का ?'' व्याधीने जर्जर झालेल्या, आईच्या ध्यानात बेभान झालेल्या भक्ताला काही कळलेच नाही. पुढ्यात तेलाची कुपी आहे. कोणीतरी अंगाला लावण्यास सांगितले आहे इतकीच जाणीव. त्यांने अंगाला तेल लावले. अंगीचा दाह शांत झाला, आग विसावली, पाणी वहाणे थांबले, दुर्गंधी नाहीशी झाली. नामस्मरणात खंड नव्हता. डोळ्यातील अश्रु मालिका तुटली नव्हती. ध्यान सुटले नव्हते. तेलाचे उपचार चालूच होता.

तिसऱ्या दिवशी तो पूर्ण बरा झाला. समाधानाने आनंदून गेला.

आता या व्याधीमुक्त वृद्धाकडे लोक आदरानें पाहू लागले. श्रद्धेने चौकशी करुन लागले. आठवेल तसे तो सांगत होता. कोणीतरी तेलाची कुपी मागितली. बसल्या जागी त्याने शोध घेतला तो तेल नव्हते व कुपीही नव्हती. औषध नव्हते आणि व्याधीही नव्हती. त्याने मनोमनी जाणले. आई जगदंबेने कृपा केली. स्वत: औषध आणून दिले. दर्शन दिले. वेदनांनी बेजार मला ते कळलेच नाही.

पुन्हा एकदा अश्रुधारा बरसू लागल्या. आई जगदंबेनेच माझ्यासाठी त्रास घेतला. निराकार, निर्गुण आदिमाया सगुण साकार झाली. माझ्यावर कृपा केली. माझी व्याधी घालविली. आई मी धन्य झालो !

॥ श्री ॥

श्री दुर्गादेवी देवस्थान फंडामार्फत करण्यात येणारे धार्मिक विधी

१)	पंचामृती पूजा/ अभिषेक	१०१.००
२)	बोडण	७५१.००
३)	नंदादीप (एका आठवड्याकरिता)	१०१.००
४)	अन्नदान (एक दिवसाकरिता)	१५००.००
५)	गोंधळ	१०१.००
६)	ब्राह्मण, कुमारिका, सुवासिनी भोजन नैवेद्यासह	३०१.००
७)	सप्तशती पाठ	१०१.००
८)	कुंकूमार्चन	१०१.००
९)	नवचंडी	१००१.००
१०)	नवचंडी हवन	५५५५.००
११)	नित्यपूजा	११११.००

दक्षिणा फंड

मामलेदार कचेरीतून दुर्गादेवीच्या नित्यपूजेकरिता दर वर्षाला काही रक्कम मिळते. तिला ''वर्षासन'' असे म्हणतात. पूर्वी या वर्षासनाची सनद गावाचे महाजन परचुरे यांच्या नांवे होती. आता या नेमणूकीची सनद श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाचे नांवे आहे. पूर्वी या नेमणूकीच्या रकमेतून महाजन वासंतिक नवरात्रोत्सवाची व्यवस्था पहात असत. हे वर्षासन शासनाने निर्माण केलेल्या दक्षिणा फंडातून दिले जाते. दक्षिणा फंड कसा निर्माण झाला याची माहिती जुनी जाणकार मंडळी अशी देतात.

व्यापाराचे निमित्त सांगून, हाती तराजू घेऊन येथे आलेल्या इंग्रजांनी हळू हळू आपली पाळेमुळे भारतभर पसरली. येथील फंदफितुरीचा, भाऊबंदकीचा उपयोग करून घेऊन आपली राजसत्ता येथे प्रस्थापित केली. याच कुटील नीतीनें, तैनाती फौजेच्या ताकदीवर इंग्रजांनी पेशवाई बुडविली. शनिवार वाड्यावरील भगवा जरीपटका खाली खेचून युनियन जॅक चढविला. पेशवाईच्या मुलखाची व्यवस्था पहाण्यासाठी इंग्रज अधिकारी नेमण्यात आला आणि तो शनिवार वाड्यात राहू लागला. पेशवाईचे वैभव उपभोगू लागला. पेशव्यांची सर्व मालमत्ता सरकारी खजिन्यात जमा झाली. पेशव्यांनी चालविलेला दान-धर्म बंद पडला.

शनिवार वाड्यात नेमलेला इंग्रज अधिकारी थोड्याच दिवसांत सैरभैर वागू लागे. त्याचे मानसिक संतुलन बिघडून जाई. दोन चार जणांचे बाबतीत याच गोष्टींची पुनरावृत्ती झाल्यावर इंग्रज शासकांनी निरनिराळ्या पद्धतीने चौकशी सुरू केली. या चौकशीत अशी माहिती समोर आली की, पेशव्यांनी गोरगरीबांच्या अन्न पाण्यासाठी, विद्वानांच्या सत्कारासांठी आणि पेशवाईतील मंदिरासाठी फार मोठी धनराशी बाजूला करून ठेवली होती. त्यातून रयतेची दाणागोट्याची सोय होत होती. हा सर्व पैसा इंग्रजांनी हडप केल्यामुळे पेशवाईची व्यवस्था पहाणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्याची दैना होते. मग यावर तोडगा काय ? आपल्या अधिकाऱ्याची होणारी ही अवस्था कशी थांबवायची ? तेव्हा विचार विनिमय , चर्चा करून असा निर्णय झाला की, पेशव्यांची सरकारी खजिन्यात जमा केलेली सर्व रक्कम शासकिय ट्रस्ट निर्माण करुन त्यात जमा करावी व त्याचे व्याजाची रक्कम दानधर्मासाठी वापरावी.

इंग्रजांना हिन्दू धर्मशास्त्राप्रमाणे दानधर्म करणे रुचले नाही. मग त्यावेळी

अस्तित्वात असलेल्या सर्व देवस्थानांना पूजेअर्चेसाठी वर्षासन या फंडातून द्यावे. ट्रस्टचे उत्पन्नातून ते खर्च करावे असा निर्णय होऊन ''दक्षिणा फंड'' निर्माण केला गेला. ही वर्षासनाची रक्कम त्याकाळात देवस्थानाची व्यवस्था पहाणारे गावाचे प्रमुख, महाजन, खोत, दिवाण इ. यांच्या नावे सनदा करून सरकारी खजिन्यातून देण्याची व्यवस्था करण्यात आली. मंदिराचे / देवस्थानांचे व्यवस्था पहाणारे ट्रस्ट निर्माण झाल्यावर याच दक्षिणा फंडातून दिलेल्या सनदा ट्रस्टचे नांवे ककून देण्यात आल्या.

आजही याच दक्षिणा फंडातून श्री दुर्गादेवीला सरकारी वर्षासन मिळत आहे.

भक्तनिवास

दुर्गादेवी मंदिरासमोर, तळ्याच्या पलिकडे पूर्वेला भक्तनिवासाची सुंदर एकमजली वास्तू उभी आहे. दहा वर्षापूर्वी २२/२५ वयोगटातील तरुणांनी स्वतंत्रपणे या वास्तूच्या कामाला सुरवात केली. या तरुण मंडळींनी भक्तनिवासाच्या कामाआधीच आपल्या संघटन कौशल्याची जाणीव ग्रामस्थांना करुन दिली होती.

साधारणपणे १९८६ साली ही तरुण मंडळी, शाळकरी मुलें होती. त्याचवर्षी देवीच्या खांबाचे नूतनीकरण झाले होते. पूर्वीचाच खांब सुबक, सुंदर रंगविलेला. खांबावरती असलेला पश्चिमाभिमुख नंदी, खांबाच्या तळाशी चारी दिशांना असलेल्या देवता कोणाच्याही मनात भरतील अशा सजविलेल्या आहेत. या खांबाच्या दक्षिण बाजूला अगदी छोटासा कोनाडा कोरुन त्यात मारुतीची छोटी मूर्ती बसविलेली आहे. हा दक्षिणाभिमुख मारुती आहे. दक्षिणाभिमुख मारुतीची देवळे अभावावनेच आढळतात. गुहागर तालुक्यातील दक्षिणाभिमुख मारुतीचे हे एकमेव स्थान असून अशा मारुतीची शनिदेव म्हणूनही पूजा प्रार्थना करतात असे अनेकजण सांगतात.

असा देवीचा खांब नव्या रंगात रंगलेला.... मुलाच्या परीक्षा संपलेल्या... सहाजिकच खेळण्याच्या निमित्ताने ही शाळकरी मुले एकत्र जमत असतं. एकदा या मुलाच्यात आकर्षक, नयनमनोहर दिसणाऱ्या देवीचा खांबाची चर्चा चालली असतांना कोणीतरी मुलगा म्हणाला,''अरे काल माझे बाबा म्हणत होते हा खांबाजवळचा छोटूकला मारुती आहे ना तो आपल्या तालुक्यात एकटाच असून त्याला शनिदेव पण म्हणतात. आईची शप्पत !'' मग गप्पा मारुतीकडे वळल्या. हा एकटा छोटूकला

मारुती सर्व बालगोपाळांना आपला वाटू लागला... आणि सहजतेने ठरले की येत्या हनुमान जयंतीला आपण ह्याचा उत्सव साजरा करायचा. आपल्यापेक्षा लहान-मोठे असलेल्या सर्वांना बरोबर घेऊन गेली २०/२२ वर्षे ही मंडळी हनुमान जयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहाने, सातत्याने चढत्या वाढत्या वैभवाने संपन्न करीत आहेत.

तेव्हाचे शाळकरी बालगोपाळ (१९८६ साली) आता तरुण झाले. दोघे चौघे आपल्या आईच्या मदतीला सून आणून संसारी झाले होते. पण हुमान जयंतीचा उत्सव सुरू होता. याच तरुण संचाने भक्तनिवासचे काम अंगावर घेऊन आपली जबाबदारी पार पाडली. दोन वर्षात भक्तनिवासाची छोटी, टूमदार इमारत भक्तांच्या सेवेसाठी उभी राहिली.

ही तरुण मंडळी आजही ते दोन वर्षाचे सर्व दिवस आमच्यासाठी मंतरलेले होते असे अभिमानानें सांगतात. या दिवसांत श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाने आम्हाला अडचणीचे वेळी समजून घेऊन आमचा उत्साह वाढविला. आर्थिक बाजू सावरुन घेतली. श्री. लुकतुके, श्री. ढवळे, श्री. दिवेकर, श्री. दातार, गुळसुंदेकर जोशी (जि. रायगड), श्री. नामजोशी यांनी मोठ्या देणग्या दिल्या. अनेक कुळाव्यांनी, भक्तांनी उदार हस्ते देणग्या तर दिल्या. त्यातूनच एक मजली भक्तनिवास उभा राहिला. आज सर्व सुविधांनी युक्त अशा पाच खोल्या आणि एक हॉल देवीच्या भक्तांसाठी उपलब्ध झाला. भक्तनिवासापर्यंत चारचाकी वाहने आणण्याची व्यवस्था आहे. पार्किंगसाठी मुबलक जागा आहे. मात्र तेथे जाण्यासाठी डॉ. खरे यांचे घरासमोरून जांगळीवाडीत जाणाऱ्या रस्त्याने आत जावून डावीकडे वळले की श्री सोमश्वराच्या मंदिराजवळून पुढे आल्यावर भक्तनिवासत येता येते. सन २००१ साली या भक्तनिवासाचे काम पूर्ण होऊन तो देवीच्या चरणी अर्पण करण्यात आला.

श्री दुर्गादेवी देवस्थान फंड

श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाचे ट्रस्ट रजिस्ट्रेशन दि. १२।५।१९५३ रोजी मा. असिस्टंट चॅरिटी कमिशनर, कोल्हापूर यांचेकडे झाले. त्यावेळी देवस्थानचे पहिले पंच म्हणून कै. नारायण गोविन्द परचुरे (महाजन) सरपंच कै. पांडुरंग महादेव खरे-चिटणीस, सदस्य म्हणून कै. दत्तात्रय शारंगधर खरे, कै. शंकर गोविन्द खरे, श्री. नारायण हरी खरे यांनी काम सांभाळले.

त्यानंतर वेळोवेळी गावातील अनेकांनी पंचकमिटीत काम करण्याची तत्परता दाखवून गावाने सोपविलेली जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडत देवस्थान फंडाची यशोध्वजा झळकत ठेवली. जुन्या परंपरा सांभाळत नवीन परंपरा निर्माण केल्या. श्री दुर्गादेवी मंदिर आणि परिसराचा विकास केला. मातेचे वैभव वाढविले. पंचकमेटी, पूजारी, ग्रामस्थ आणि कुळावे (येणारे भक्त) यांच्यात कधीच मतभेद, वाद निर्माण झाले नाहीत. वडिलधाऱ्या मंडळींनी घालून दिलेला हा वसा या पुढील काळात नवीन मंडळी सांभाळतील.

देवीचे दागिने अगदी सुरवातीच्या काळात फार नव्हतेच पण होते ते देवीच्या मूर्तीवरच. थोडे वाढल्यावर महाजनांचे ताब्यात आणि नंतर पुजाऱ्यांचे ताब्यात राहिले. त्यासाठी दोन लोखंडी कपाटांची व्यवस्था करण्यात आली. देवीला दागिने देणाऱ्या भक्तांची संख्या वाढली. नवरात्रात देवीला घालण्यासाठी पंचकमिटी ने काही दागिने घडवून घेतले. ही दागिन्यांची संख्या इतकी वाढली की हे सर्व दागिने पुजाऱ्यांकडे ठेवणे पंचाना आणि पुजाऱ्यांनाही जोखमीचे वाटू लागले आणि दागिने बँकेच्या सेफ डिपॉझिट लॉकरमध्ये ठेवण्यात आले. वज्रटिक, नवग्रह हार, लक्ष्मीहार, पुतळीहार, सरी, एकदाणी, ठुशी, सुलोचना हार, मोतीहार, गोफ, बांगड्या, पाटल्या, तोडे, मुकुट, कुडी, बुगडी, नथ, सुंकले, मंगळसूत्र, कुंकुपट्टी हे सोन्याचे तर फुलेहार, मोगराहार, मणीहार, कंबरपट्टा, छल्ला, वळी, खटवी-जोडवी, वाले, पादुका, छत्री, तोरणे, पाळणे, रथ, निरांजने, कुंकू करंडे, आपट्याची पाने, सुपाऱ्या, नारळ, लामण दिवा, चौरंग, धुपारत, समई असे चांदीचे दागिने लॉकर मध्ये आहेत. तांब्या- पितळेची अनेक पूजा उपकरणे भक्तांनी देवीला दिली आहेत. त्यात समया, तांब्या,भांडे, पळी -पंचपात्री, ताम्हने, पंचारत, वाट्या,भांडी,ताटे अशा अनेक वस्तू आहेत. या सर्व

वस्तूंची पूर्वीपासून नोंदणी व जपणूक काळजीपूर्वक ठेवल्याचे जुन्या दप्तरावरून लक्षात येते.

श्री दुर्गादेवी मंदिराचे उत्पन्न वाढू लागताच त्या त्या वेळच्या पंचांनी मनाचे श्लोक, श्रीमत् भगवत्गीता पाठांतर स्पर्धा , पोहण्याच्या स्पर्धा, धार्मिक विषयांवर व्याख्याने, धार्मिक पुस्तकांची प्रकाशने, अशा समाजाभिमुख कार्यांना सुरवात केली. पेठे, खरे, कुलसंम्मेलनांसाठी मंदिर परिसर उपलब्ध करून दिला. मुळचे ग्रामस्थ उद्योग धंद्यासाठी परगांवी गेले आणि आपल्या कर्तृत्वाने तेथे समाजाकडून त्यांना मान सन्मान मिळाले अशांचे, तसेच बाहेर गावच्या भक्तांचे सत्कार श्री दुर्गादेवीच्या मंदिरात करण्याची प्रथा निर्माण केली.

विद्यमान पंचकमेटिने या सर्व प्रथा, परंपरा जपून अधिक वाढविल्या आहेत. आरोग्य, शिक्षण, धर्मशिक्षण, पौरोहित्य प्रशिक्षण वर्गाना सहकार्य करून समाजसेवा करण्यास सुरवात केली आहे. त्याचे अधिक तपशिल द्यायचे झाल्यास वे.मू. फाटक गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली, जिल्ह्यातील पौरोहित्य करणाऱ्यांचे घेतलेले कुंडार्क विधी प्रशिक्षण शिबीर, नागालॅन्ड मधील रेणुका माता नागालॅन्ड विद्यार्थिनी छात्रावास, चिपळूण येथे शिक्षणासाठी आलेल्या मुलींना श्री दुर्गादेवीचे मंदिरात आणून हिन्दू संस्कृती, सण यांची करून दिलेली ओळख, भाऊबीज कार्यक्रमात सहभाग, साड्यांचे वाटप. भक्तराज वालावलकर ट्रस्टच्या डेरवण हॉस्पिटलच्या डॉ. सुवर्णाताई पाटील यांना येथे सन्मानाने निमंत्रित करून ग्रामीण महिलांसाठी घेतलेले वैद्यकीय शिबीर, जिल्हास्तरीय गायन स्पर्धा, पोहण्याच्या स्पर्धा असे राबविलेले विविध उपक्रम सांगता येतील.

या ही पुढे जाऊन दुर्गम भागातील, गरीब विद्यार्थी व महिलांचा विकास व्हावा म्हणून शालोपयोगी साहित्य वितरण, शिक्षण व आरोग्य विषयक जाणीव (अवेअरनेस) निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण, प्रबोधन वर्ग आयोजित करण्याची, ग्रामीण कला-कौशल्य, लोककला, लोकनृत्य यांचे संवर्धन होण्यासाठी भरीव काम करण्याची इच्छा पंचकमेटीने व्यक्त केली आहे.

- नम्र निवेदन -

आई जगदंबेच्या कृपाशीर्वादाने, आपल्या सर्व भक्तांचे सहकार्याने आणि भक्कम आर्थिक पाठबळावर श्रींचे सौंदर्य पूर्ण वैभवशाली मंदिर निर्माण झाले. आईच्या परिसराचा सुंदर विकास झाला.भक्तनिवासाची डुमदार वास्तू उभी राहिली.

दिवसेंदिवस श्रींचे दर्शनाला येणाऱ्या भक्तांची गर्दी वाढत आहे. सहाजिकच भक्तांसाठी आज उपलब्ध असलेली व्यवस्था अपुरी पडू लागली आहे. भक्तांच्या आग्रहाखातर श्रींचे प्राकारातील धर्मशाळेच्या जागेवर प्रशस्त असे भोजनगृह व पहिल्या मजल्यावर वातानुकुलीत सर्व सुविधांनी युक्त निवास व्यवस्था असलेली जगदंब निवास वास्तू बांधण्याचा संकल्प पंच कमेटीने केला आहे. त्याच बरोबर दर्शनाला येणाऱ्या पर्यटकांसाठी स्वच्छतागृह, प्रसाधनगृह बांधणे गरजेचे झाले आहे.

आपणा सर्वांच्या उदंड प्रतिसादामध्येच आई जगदंबेच्या कृपेने संकल्पित वास्तूचे निर्माण कार्य सिध्दीस जाईल यात शंकाच नाही. संकल्पित कामांचा एकत्रित खर्च २१ लाखांच्याही पुढे जाणार आहे.

सर्व भक्तांना आई जगदंबेने उदंड वैभव दिले आहे. दान/देणगी प्रवृत्ती रुजविली आहे. आपणा सर्वांकडून आर्थिक पाठबळाची व सर्व सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

देणारानें देत जावे । घेणाऱ्याने घेत जावे ।
घेता घेता घेणाऱ्याने। देणाऱ्याचे हात घ्यावे ॥

अध्यक्ष
श्री दुर्गादेवी देवस्थान फंड
वरचापाट -गुहागर

सांस्कृतिक उपक्रम

सुप्रसिध्द मराठी अभिनेते डॉ. गिरीश ओक 'विचिमांगण' सादर करताना

गुहागरचे सुपुत्र कै. गोविंदराव पटवर्धन यांचे शिष्य डॉ. विद्याधर ओक व आदित्य ओक हार्मोनियम जुगलबंदी सादर करताना

सांस्कृतिक उपक्रम

मंगळागौरीचा खेळ खेळताना स्थानिक महिला

वेळणेश्वर येथील तालुकास्तरीय भजन स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल
श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाने वरचापाट भगिनी मंडळीचा यथोचित सत्कार केला.

सामाजिक बांधिलकी

ब्रह्मर्षी फाटक गुरूजी यांचे मार्गदर्शनाखाली श्री दुर्गादेवी देवस्थानने 'पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग' घेतला होता त्यावेळी ब्रह्मर्षी फाटक गुरूजी यांचे आशीर्वाद घेताना पंच मंडळ

रा. स्व. संघ जनकल्याण समिती माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या नागालँड विद्यार्थिनी वसतीगृहातील मुलींना 'हिंदू संस्कृती दर्शनाच्या' कार्यक्रमाचे आयोजन दुर्गादेवी देवस्थान फंडाने केले होते.

श्री दुर्गादेवी देवस्थान फंडाचे अध्यक्ष श्री. किरण खरे नागालँडमधील मुलीला साडी व श्रीफळ प्रसाद म्हणून देताना

सामाजिक बांधिलकी

नवरात्रोत्सवात 'गुणीजनांचा सत्कार' करतांना आमदार श्री. भास्कर जाधव, उद्योजक श्री. श्रीराम खरे, पं. स. सभापती श्री. विठ्ठल भालेकर आणि मान्यवर

१ ऑगस्ट 'क्रांतिदिन' चे दिवशी गुहागर हायस्कूल येथे 'समुह गीत गायन' स्पर्धेचे आयोजन श्री दुगदिवी देवस्थान फंडाने केले होते. त्यामधील स्पर्धक

'समुह गीत गायन' स्पर्धेतील विजयी गटाला बक्षीस वितरण करताना श्री दुगदिवी देवस्थान फंडाचे उपाध्यक्ष श्री. गोविंदराव दीक्षित व व्यवस्थापिका कु. सारीका खरे

श्री दुर्गादेवी येथील भक्तनिवास

श्री दुर्गादेवीचे महाद्वार

देवीचा खांब

''गुहागरनिवासिनी श्री दुर्गादेवी'' या पुस्तकाचे प्रकाशन २००१ मध्ये झाले. त्यावेळी ज्येष्ठ-श्रेष्ठ, जुन्या जाणत्या भक्तांनी दिलेली माहिती संकलित करुन जी मांडणी माझ्या हातून घडली त्याचे अनेकांनी कौतुक केले. आता २००८ मध्ये मंदिर आणि परिसराचे रंगरूप बदलले आहे. भक्तनिवास सारख्या व्यवस्था उपलब्ध आहेत. तेव्हा या सर्वांचा उल्लेख असलेली सुधारित आवृत्ती काढणे गरजेचे बनले.

त्यानिमित्ताने जगन्मातेच्या स्मरणात, चिंतनात काही दिवस रमलो त्याने भरून पावलो. हा विषयच जिव्हाळ्याचा, भक्तीचा, जगदंबेच्या कृपाप्रसादाने भरलेला आहे. त्यातच ग्रामस्थांचे सहकार्य, पुजाऱ्यांनी व्रतस्थपणे जपलेल्या परंपरा, पंचांनी केलेली नि:स्वार्थी सेवा, भक्तांनी दिलेले आर्थिक पाठबळ या सर्वांतून श्री दुर्गादेवीचे वैभव सदैव वर्धिष्णू राहिले आहे. या सर्व गोष्टींचा घेतलेला आढावा मी फक्त संकलित केला आहे. मला हा खारीचा वाटा उचलता आला यातच धन्यता आहे.

- मु. रा. तथा नाना पाटणकर, गुहागर